**2019 IV 13** **0930** **Seat No.** | | | | | |

---

**Time : 2½ Hours**

# MARATHI (T.L.)

(For Chidren With Special Needs)

**Subject Code**

| S | 1 | 4 | 8 |
|---|---|---|---|

**Total No. of Questions : 9** **(Printed Pages : 12)** **Maximum Marks : 80**

---

***सूचना :*** (*i*) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहा.

(*ii*) प्रश्नाचा क्रमांक व उपप्रश्नांचा क्रमांक स्पष्टपणे लिहा.

(*iii*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*iv*) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

1. (अ) पुढील प्रत्येक विधानाखाली चार पर्याय दिलेले आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण करून लिहा :

(1) गोपूच्या आईने पदरात बांधलेली ........................................ . 1

(अ) जोंधळ्याची अर्धी भाकर बाहेर काढली.

(ब) नाचणीची अर्धी भाकर बाहेर काढली.

(क) गव्हाची अर्धी भाकर बाहेर काढली.

(ड) तांदळाची अर्धी भाकर बाहेर काढली.

(2) लेखक आपल्या मित्राबरोबर .......................... . 1

(अ) मातृभाषेत बोलू लागला.

(ब) हिंदी भाषेत बोलू लागला.

(क) इंग्रजी भाषेत संभाषण करू लागला.

(ड) चित्पावनी भाषेत प्रश्नोत्तरे करू लागला.

(3) कोणती कामे करावयाची आहेत त्याची आठवण म्हणून ........................ . 1

(अ) शर्टाला गाठी मारून ठेवल्या.

(ब) उपरण्याला गाठी मारून ठेवल्या.

(क) रूमालाला गाठी मारून ठेवल्या.

(ड) धोतराला गाठी मारून ठेवल्या

(4) गाड्याचे रेडे जलद धावू नये म्हणून गाडेकार चाकांना ......................... . 1

(अ) लाकडाचा ब्रेक लावत असे.

(ब) लोखंडी ब्रेक लावत असे.

(क) दोरखंडाचा ब्रेक लावत असे.

(ड) चामडी पट्ट्यांचा ब्रेक लावत असे.

(ब) पुढीलपैकी कोणत्याही **सात** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 7

(*i*) प्रल्हादाचे शरीर कोणत्या **चार** पुरुषांनी सोडले ?

(*ii*) झाडावर चढणाऱ्या माशाचे नाव काय ?

(*iii*) गोकुळचा स्वभाव कसा होता ?

(*iv*) गाडेकाराचे घर कोठे होते ?

(*v*) लेखिकेने 'निसर्गकन्या' कोणाला म्हटले आहे ?

(*vi*) मेजर रॉयना कोणता सन्मान मिळाला होता ?

(*vii*) पोपटांनी भात कोठे लपविले होते ?

(*viii*) पाटील कोणत्या गावचे होते ?

(*ix*) पत्रकार व्यक्तीचे नाव काय होते ?

(*x*) गोविंदशास्त्री भावे यांचा स्वभाव कसा होता ?

2. (अ) खालील 'अ' गटात पाठांची नावे दिली आहेत व 'ब' गटात त्यांच्या लेखकांची नावे दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : 4

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| (*i*) जंगलाचं देणं | (अ) रणजीत देसाई |
| (*ii*) पेहलगाम | (ब) पं. महादेवशास्त्री जोशी |
| (*iii*) शिवाजी 'राजे' शोभले | (क) मारूती चितमपल्ली |
| (*iv*) अमृताची वाट | (ड) नंदा मडकईकर |

(ब) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** ते **तीन** वाक्यांत लिहा : 4

(*i*) मेजर रॉयच्या मते खरी अमानुषता कोणती ?

(*ii*) कुशाबाच्या लहानपणी शाळेत कोणता प्रसंग घडला होता ?

(*iii*) इंद्रावर कोणता बिकट प्रसंग ओढावला ?

3. (अ) पुढील प्रत्येक विधानाखाली चार पर्याय दिलेले आहेत. त्यातील अचूक पर्याय निवडून विधान पूर्ण करून लिहा :

(1) मने इच्छा पुरविली ...................................... . 1

(अ) मने मना पूजा केली.

(ब) मन माऊली सकळांची.

(क) गती अथवा अधोगती.

(ड) करी आपुलेची दास्य.

(2) धावशी मजेत ............................ . 1

(अ) चालले चुरून

(ब) बेहोश होऊन

(क) बोलली माजून

(ड) वेगात वरून

(ब) खाली दिलेल्या वाक्यांशांच्या जोड्या लावा : 2

| **'अ' गट** | **'ब' गट** |
| --- | --- |
| (*i*) अवघी सत्ता आली हाता | (अ) गई शोधण्याची |
| (*ii*) गई वाचण्याची | (ब) तेचि माझे रूप पूर्ण |
| | (क) गई पुस्तकाची |
| | (ड) नामयाचा खेचरी दाता |

(क) खालील कवितांच्या ओळीतील मोकळ्या जागी कंसातील पर्यायी शब्दांपैकी योग्य शब्द लिहून ओळी पूर्ण करून पुन्हा लिहा : 4

(*i*) ओढा नेई ………………………………… वाटे वाहूनिया दूर.

(चांदी, रूपे, सोने)

(*ii*) आठवा मनी ……………………………… आठवा प्रतापगाजि.

(संभाजी, शिवाजी, दीपाजी)

(*iii*) विसरूनी जाय तेव्हा ……………………………… माणसाला.

(देह, शरीर, माणूस)

(*iv*) आग पेटली–पेटली …………………………… तन–मन.

(वितळले, जळले, पिघळले)

4. खालीलपैकी कोणत्याही **सात** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 7

(*i*) कीर्तनाच्या रंगी नाचून नामदेव कोणता दीप लावू इच्छितात ?

(*ii*) मजूर स्त्रीचे बाळ कोठे झोपले ?

(*iii*) तुकारामांनी मनास कोणती उपमा दिली आहे ?

(*iv*) आपण पाठांतर केव्हा करावे असे समर्थ रामदास सांगतात ?

(*v*) कवीने फुलपाखरास काय म्हटले आहे ?

(*vi*) जमीन आगगाडीला कशी विनवीत आहे ?

(*vii*) आपण कोणाच्या शिरावर स्वार झाले पाहिजे असे कवी विंदा करंदीकर सांगतात ?

(*viii*) भेदाभेद ज्यांना ठाऊक नाहीत अशी माणसे काय जाणतात ?

(*ix*) आगगाडी जमिनिच्या छातीत काय पाडते ?

5\. (अ) कंसातील सूचनेप्रमाणे लिहा :

(*i*) मुलगा पुस्तक वाचतो. 1

(काळ ओळखून लिहा)

(*ii*) अहमदने चित्र ठेवले. 1

(क्रियापद ओळखून लिहा)

(*iii*) मोती दूर बसला होता. 1

(नाम ओळखून लिहा)

(*iv*) आमचा बंगला छान दिसतो. 1

(सर्वनाम ओळखून लिहा)

(*v*) मला उंच पहाड दिसत होता. 1

(विशेषण ओळखून लिहा)

(ब) पुढील वाक्यांतील अधोरेखित अव्ययांच्या जाती ओळखून लिहा :

(*i*) बाप रे ! केवढा मोठा साप ? 1

(*ii*) सायंकाळी पक्षी घरट्यात परतले. 1

(*iii*) झाडाखाली कुत्रा बसला आहे. 1

(*iv*) विमलने आंबे व केळी घेतली. 1

(क) पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दांपासून विशेषणे बनवा : 2

जसे : लोखंड – लोखंडी

(*i*) रंग –

(*ii*) लाकूड –

(*iii*) हिशेब –

(*iv*) लबाड –

(ड) पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दांपासून भाववाचक नामे बनवा : 2

जसे : लहान – लहानपण

(*i*) पोक्त –

(*ii*) खोडकर –

(*iii*) देव –

(*iv*) तरूण –

(इ) खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा : 2

(*i*) गाय –

(*ii*) घोडा –

(*iii*) आई –

(*iv*) मामा –

(ई) खालील शब्दांची अनेकवचनी रूपे लिहा : 2

(*i*) पुस्तक –

(*ii*) गाडी –

(*iii*) फूल –

(*iv*) वही –

6. (अ) पुढील ‘अ’ गटातील शब्दांच्या ‘ब’ गटातील विरुद्ध शब्दांशी योग्य जोड्या लावा : 2

| **‘अ’ गट** | | **‘ब’ गट** | |
|---|---|---|---|
| (*i*) | ज्ञान | (अ) | नापास |
| (*ii*) | लक्षण | (ब) | बेईमान |
| (*iii*) | पास | (क) | अज्ञान |
| (*iv*) | ईमान | (ड) | अवलक्षण |

(ब) पुढील 'अ' गटातील शब्दांच्या 'ब' गटातील समानार्थी शब्दांशी योग्य जोड्या लावा : 2

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| (*i*) शहर | (अ) जल |
| (*ii*) सर्प | (ब) नगर |
| (*iii*) वार्ता | (क) साप |
| (*iv*) पाणी | (ड) बातमी |

(क) खाली दिलेल्या नामांच्या विविध प्रकारात वर्गीकरण करून खालील तक्त्यांत लिहा : 4

(शाळा, नेतृत्व, म्हापसा, म्हातारपण, खिडकी, तुकाराम, लुच्चेगिरी, जुवारी)

| **सामान्यनाम** | **विशेषनाम** | **भाववाचकनाम** |
|---|---|---|
| | | |

(ड) खालील वाक्यांतील सर्वनामे ओळखून लिहा : 4

(*i*) आपण खेळायला जाऊया.

(*ii*) शिक्षकांनी विचारले, तुम्हाला काय हवे ?

(*iii*) गुरूजींच्या प्रश्नाला त्याने उत्तर दिले.

(*iv*) तो गोष्ट सांगू लागला.

(इ) खालील वाक्यांतील अव्यये ओळखून लिहा : 4

(*i*) अरे ! एवढ्या रात्री तू कुठे निघालास ?

(*ii*) आई पाण्याचा तांब्या आणि गुळ घेऊन आली.

(*iii*) घंटा जोरात वाजली.

(*iv*) रमेश बसमागे धावू लागला.

7. खालील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 4

कोकणात तांदुळ जास्त पिकतो. त्यामुळे येथील लोकांच्या जेवणात विशेष करून भात असतो. भात, तांदळाची किंवा नाचणीची भाकरी, आमटी, कडधान्याच्या उसळी, डाळी, भाजीपाला हे पदार्थ जेवणात असतात. ज्वारीची भाकरी व गव्हाच्या पोळ्या यांचाही जेवणात समावेश असतो. समुद्रकिनारी राहणाऱ्या लोकांच्या जेवणात भात व मासे असतात. कोकणात नारळांचे उत्पन्न जास्त होते. त्यामुळे स्वयंपाकात ओले खोबरे बरेच वापरतात.

**प्रश्न :**

(*i*) कोकणातील लोक जेवणात ओले खोबरे जास्त का वापरतात ?

(*ii*) कोकणात कोणत्या पिकाते उत्पादन जास्त होते ?

(*iii*) कोकणातील लोकांच्या जेवणात कशाचा समावेश असतो ?

(*iv*) समुद्रकिनारी राहणाऱ्या लोकांच्या जेवणात काय असते ?

8. पुढील चित्राच्या आधारे त्याखालील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 4




एकोणीस डिसेंबर हा गोव्याचा मुक्तिदिन. या दिवशी आपण झेंडावंदन करतो. कारण या दिवशी आपला गोवा पोर्तुगिजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. गोव्यावर पोर्तुगिजांचे राज्य होते. ते आपल्यावर अन्याय करत. हा अन्याय आपण साडेचारशे वर्षे सहन केला. शेवटी पोर्तुगिजांना आपला गोवा 19 डिसेंबर 1961 रोजी सोडावा लागला.

**प्रश्न :**

(*i*) गोव्याचा मुक्तिदिन कोणता ?

(*ii*) गोवा मुक्तिदिनी आपण काय करतो ?

(*iii*) गोव्यावर कोणाचे राज्य होते ?

(*iv*) पोर्तुगिजांनी गोवा कधी सोडला ?

9. तुम्ही मानसी पत्रे आहात. तुमचा पत्ता कैलास नगर, अस्नोडा–गोवा असा आहे. तुम्ही तुमच्या बहिणिला, तुम्ही सहलीला जाणार असल्याचे पत्राने कळवा. 5

पत्र लिहिताना खालील मुद्यांचा आधार घ्या :

**प्रश्न :**

(*i*) सहलीची तारीख वा जागा.

(*ii*) सकाळी किती वाजता निघणार ?

(*iii*) कोणकोण जाणार ?

(*iv*) खाण्यापिण्याचा बेत काय आखला आहे ?

**किंवा**

खालील संवाद आई व मुलगा यांच्यामधला आहे. तो तुमच्या शब्दांत पूर्ण करून संपूर्ण संवाद पुन्हा लिहा : 5

आई : राजू, अभ्यास झाला का ?

राजू : हो आई. तू यायच्या आधीच .......................................

आई : शाब्बास ! मलाही आज कामावरून घरी यायला ऊशीर झाला.

राजू : तुझी वाट पाहून मी दूध गरम करून घेतलं. तुला .............................

आई : नको, माझी तब्बेत ..............................................

राजू : बाबांना फोन करू का ? ते डॉक्टरना ..................................

आई : औषधाची गरज वाटत नाही. थोडी विश्रांती ..................................

राजू : आई, तू खरंच थोडा वेळ आराम कर.